SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR-416 004. MAHARASHTRA
PHONE : EPABX - 2609000 GRAM : UNISHIVAJI
FAX : 0091-0231-2691533 & 0091-0231-2692333
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर - ४१६ ००४. महाराष्ट्र
दूरध्वनी (ईपीएबीएक्स) २६०९००० (संलग्नता विभाग - २६०९०८९, २६०९१३६)
तार : युनिशिवाजी फॅक्स : ००९१-०२३१-२६९१५३३ व २६९२३३३.

B Accredited By
NAAC (2009)

जा.क्र. संलग्नता/टे.१/युजीके/ 28 दिनांक :

प्रति,
मा. प्राचार्य/ मा. संचालक,
सर्व संलग्न महाविद्यालये/ मान्यताप्राप्त शिक्षण संस्था

10 MAY 2012

विषय : महाविद्यालयीन अध्यापकांच्या नियत वयोमानानुसार सेवानिवृत्तीच्या वयोमर्यादेत वाढ करण्याबाबतचा प्रस्ताव विद्यापीठास सादर करण्यासाठीच्या मार्गदर्शक सूचना

संदर्भ :-
१) क्र. संकिर्ण-२०१०/(५०३/१०)विशि-१ दि. ०५ मार्च, २०११ चा शासन निर्णय,
२) क्र. संकिर्ण-२०११/(३९६/११)विशि-१ दि. २३ नोव्हेंबर, २०११ चा शासन निर्णय,
३) क्र. संकिर्ण-२०११/(३९६/११)विशि-१ दि. ०१ डिसेंबर, २०११ चा शासन निर्णय,
४) क्र. संकिर्ण-२०११/(३९६/११)विशि-१ दि. २३ फेब्रुवारी, २०१२ चे शासन शुध्दीपत्रक,

महोदय/ महोदया,

उपरोक्त संदर्भांकित विषयास अनुसरून आपणास कळविणेत येते की, आपल्या महाविद्यालयातील जे शिक्षक नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त होणार आहेत. त्यांच्या सेवानिवृत्तीच्या वयोमर्यादेत वाढ करण्याबाबतचे प्रस्ताव विद्यापीठास सादर करण्यासंदर्भातील मार्गदर्शक सूचना, अनुक्रमणिकेचा नमुना तसेच आवश्यक परिशिष्टांचा नमुना सोबत पाठवत आहे.

शिक्षकांच्या सेवानिवृत्तीच्या वयोमर्यादेत वाढ करण्यासंदर्भात शासनाने निर्गमित केलेले उपरोक्त संदर्भीय शासन निर्णय/शुध्दीपत्रक अवलोकनी घेवून तसेच सोबत जोडलेल्या मार्गदर्शक सूचना विचारात घेवून शिक्षकांचे सेवानिवृत्तीच्या वयोमर्यादेत वाढ करण्याबाबतचे प्रस्ताव आपल्या स्तरावर छाननी करावेत. शासन निर्णयामध्ये विहित केलेल्या कालावधीमध्ये प्रस्ताव विद्यापीठास सादर करण्यात यावेत. विहित मुदतीत प्रस्ताव न आल्यास त्याअनुषंगाने होणाऱ्या तक्रारी अथवा न्यायालयीन प्रकरण उद्‌भवल्यास त्याची जबाबदारी संबंधित महाविद्यालयाची राहील याची नोंद घ्यावी.

कळावे,

आपला विश्वासू,

उपकुलसचिव,
संलग्नता विभाग

सदरचे पत्र व त्याची जोडपत्रे विद्यापीठाच्या www.unishivaji.ac.in या संकेतस्थळावर BCUD - Circulars या ठिकाणी उपलब्ध आहे.

## महाविद्यालयीन अध्यापकांच्या नियत वयोमानानुसार सेवानिवृत्तीच्या वयोमर्यादेत वाढ करण्याबाबतचा प्रस्ताव विद्यापीठास सादर करण्यासाठीच्या मार्गदर्शक सूचना

महाविद्यालयीन अध्यापकांच्या नियत वयोमानानुसार सेवानिवृत्तीच्या वयोमर्यादेत वाढ करण्याबाबतचा प्रस्ताव विद्यापीठास सादर करताना खालील सूचनांचे पालन करावे.

१. शासन निर्णयात विहीत केलेल्या कालावधीमध्ये शिक्षकांचे प्रस्ताव संबंधित महाविद्यालयांच्या प्राचार्यांमार्फत सादर करावेत.

२. शासकीय तज्ञ वैद्यकीय समितीचे वैद्यकीय प्रमाणपत्र सेवानिवृत्तीपूर्वी ३ महिने अगोदर संस्थेकडे सादर करावे. वैद्यकीय प्रमाणपत्राशिवाय प्रस्ताव पाठवू नयेत.

३. प्रस्तावासोबत जोडलेल्या सर्व प्रमाणपत्रांच्या छायांकित प्रती संबंधित प्राचार्यांनी साक्षांकित केलेल्या असाव्यात.

४. संपूर्ण प्रस्तावांच्या पृष्ठांना वरून खालीपर्यत क्रमांक द्यावेत. त्याची सोबतच्या नमुन्याप्रमाणे अनुक्रमणिका करावी व प्रस्तावाला सर्वप्रथम जोडावी.

५. प्रस्तावास विद्यापीठाच्या नियमित मान्यतापत्रे तसेच चेंजीस-इन-स्टाफ मान्यतापत्रे जोडावीत.

६. प्रस्ताव ६ प्रतीमध्ये विद्यापीठास सादर करावेत.

७. शैक्षणिक अर्हतेबाबतची कागदपत्रे जोडावीत.

८. मागील पाच वर्षाचे गोपनीय अहवाल (Self Appraisal Report) जोडावेत.

९. संशोधन प्रकल्पाच्या (Minor/Major Research Project) मान्यतेची कागदपत्रे तसेच संशोधन प्रकल्पाच्या अहवालाच्या प्रथम व अंतीम पृष्ठाची छायांकित प्रत जोडावी.

१०. राज्य, राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय तसेच प्रादेशिक स्तरावरील संशोधन लेख (Research Articles) प्रसिध्द केले असलेस ते सोबत जोडावेत.

११. अध्यापन करीत असलेल्या व त्याव्यतिरिक्त विषयातील संदर्भग्रंथ, संपादित ग्रंथ प्रकाशित केले असलेस त्याची पहिल्या व शेवटच्या पृष्ठांची छायांकित प्रत जोडावी.

१२. अध्यापन करीत असलेल्या विषयातील कोणकोणत्या प्राधिकरण/मंडळ/संस्था इ. यावर सदस्य आहेत. त्याबाबतची पुरावा कागदपत्रे जोडावीत.

१३. अध्यापन करीत असलेल्या विषय व इतर उपक्रमांमध्ये किती, पारितोषिके मिळाली आहेत. त्याच्या प्रमाणपत्रांच्या साक्षांकित प्रती जोडाव्यात.

१४. राज्य/राष्ट्रीय किती पुरस्कार प्राप्त आहेत त्याबाबतची प्रमाणपत्रे जोडावीत

१५. अनुक्रमांक ९, १० व ११ मध्ये नमुद केल्याप्रमाणे संशोधन प्रकल्प, संशोधन लेख, संदर्भ ग्रंथ तसेच संपादित ग्रंथ यांच्या मुळ प्रतीसह (Original Copies) संबंधित उमेदवाराने बैठकीच्यावेळी समक्ष स्वखर्चाने उपस्थित रहावे.

१६. अनुक्रमणिकेतील क्रमांक ५ ते ११ मुद्यांबाबत फक्त संख्या नमूद करावी. त्यासंदर्भातील परिपूर्ण माहिती सोबत जोडलेल्या परिशिष्टामध्ये भरून प्रस्तावासोबत पाठवावी.

१७. संदर्भ ग्रंथ अभ्यासक्रमात समावेश असतील तर त्याबाबतची विद्यापीठाची मान्यता पत्रे जोडावीत.

१८. शासनाने आदेश दिल्याप्रमाणे विद्यापीठ स्तरावर हे कामकाज सुरू आहे. यासाठी तज्ज्ञांचा/ सदस्यांचा मेहनताना/प्रवासभत्ता/दै. भत्ता प्रशासकीय खर्च, प्रशासकीय कर्मचाऱ्यांचे मानधन व इतर संकिर्ण खर्च असा खर्च सध्या विद्यापीठ प्रशासन करीत आहे. तथापी यासाठी काही शुल्क/फी आकारण्यात येईल ते भरणे बंधनकारक राहील.

१९. दिनांक २३/०२/२०१२ च्या शुध्दीपत्रकात मा. उच्च न्यायालयाच्या निर्णयातील परिच्छेद ||| मध्ये निर्देशित केल्याप्रमाणे Academic Achievements मागील पाच वर्षांची माहिती द्यावी.

२०. सोबत संपूर्ण माहितीच्या तपशीलांचा एक गोषवारा (Summary) जोडावा.

२१. ज्या क्रमाने माहिती मागितली आहे. त्या क्रमावारीने कागदपत्रे लावावीत. अनावश्यक कागदपत्रे जोडू नयेत.

**उपरोक्त सूचनांचे तंतोतंत पालन करावे. अपूर्ण, विहित कालावधीत नसलेले व ६ पेक्षा कमी प्रतीमध्ये सादर केलेले अहवाल स्विकारले जाणार नाहीत. व त्याबाबत विद्यापीठाकडून कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही याची संबंधितांनी नोंद घ्यावी.**

उपकुलसचिव,
संलग्नता विभाग

# अनुक्रमणिका

## महाविद्यालयीन अध्यापक पदांच्या नियत वयोमानानुसार सेवानिवृत्तीच्या वयोमर्यादेत वाढ करण्याबाबतचा प्रस्ताव

| अ.न. | शिक्षकाचे नाव | महाविद्यालयाचे नाव | विषयाचे नाव | सेवानिवृत्तीची तारीख |
|---|---|---|---|---|
| | | | | |

| अ.न. | निकष | | पान नंबर |
|---|---|---|---|
| १ | अध्यापकाची प्रथम नियुक्ती विद्यापीठ अनुदान आयोग व राज्य शासनाने विहीत केलेल्या पात्रता, अटी व शर्तीप्रमाणे झालेली आहे काय? | होय / नाही | |
| २ | अध्यापकांची शारिरीक व मानसिक क्षमता सुदृढ असणे आवश्यक असून त्याबाबत तज्ञ वैद्यकीय समितीचे (Govt. Medical Committee) प्रमाणपत्र सेवानिवृत्तीपूर्वी तीन महिने अगोदर संबंधित संस्था/महाविद्यालयास सादर केले आहे की नाही. | होय / नाही | |
| ३ | अध्यापकांनी पीएच. डी. अथवा विद्यापीठ अनुदान आयोग तथा आखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेच्या निकषानुसार पीएच. डी. शी समकक्ष अशी शैक्षणिक अर्हता धारण केली आहे. | होय / नाही | |
| ४ | अध्यापकांच्या मुदत वाढीच्या दिनांकापूर्वीचे मागील पाच वर्षातील वार्षिक गोपनीय अहवाल विचारात घेवून सदर गोपनीय अहवालाची सर्वसाधारण मुल्यमापनाची प्रतवारी | २००६-०७ -<br>२००७-०८ -<br>२००८-०९ -<br>२००९-१० -<br>२०१०-११ - | |

| अ.न. | निकष | | | | पान नंबर |
|---|---|---|---|---|---|
| ५ | संशोधनाचे मोठे (Major) व लघु (Minor) स्वरूपाचे किती प्रकल्प तयार करण्यात आले आहेत. | Major | Minor | | |
| ६ | संबंधित अध्यापकाने विविध स्तरावरील चर्चासत्र /परिसंवाद/कार्यशाळामध्ये किती संशोधन लेख (Research Paper) सादर केले आहेत.<br>विभागीय -<br>राज्य -<br>राष्ट्रीय - | चर्चासत्र | कार्यशाळा | परिसंवाद | |
| ७ | राज्य / राष्ट्रीय /आंतरराष्ट्रीय किती कार्यशाळा / चर्चासत्रांना उपस्थित राहिले.<br>विभागीय स्तर -<br>राज्य स्तरीय -<br>राष्ट्रीय स्तरीय - | चर्चासत्र | कार्यशाळा | परिसंवाद | |
| ८ | अध्यापन करीत असलेल्या विषयातील किती संदर्भ ग्रंथ /क्रमिक पुस्तके प्रकाशित केले आहेत. -<br>त्यापैकी किती संदर्भ ग्रंथ/ क्रमिक पुस्तके समावेश अभ्यासक्रमामध्ये करण्यात आला आहे. - | | | | |
| ९ | अध्यापन करीत असलेल्या विषयाव्यतिरिक्त किती संदर्भ ग्रंथ/ क्रमिक पुस्तके प्रकाशित केले आहेत. -<br>त्यापैकी किती संदर्भ ग्रंथांचा/ क्रमिक पुस्तकांचा समावेश अभ्यासक्रमामध्ये करण्यात आला आहे. - | | | | |
| १० | अध्यापन करीत असलेल्या विषयातील कोणकोणत्या प्राधिकरण / मंडळ / संस्था यावर सदस्य आहेत. | | | | |
| ११ | संबंधित अध्यापकाने विविध स्तरावरील उपक्रमामध्ये किती पारितोषिक/पुरस्कार/प्रशस्तीपत्र प्राप्त केले आहे.<br>पारितोषिके -<br>पुरस्कार -<br>प्रशस्तीपत्र - | राज्यस्तर | राष्ट्रीयस्तर | | |

- संपूर्ण प्रस्तावातील पृष्ठांना वरून खालीपर्यत क्रमांक द्यावेत व ते क्रमांक सदर अनुक्रमणिकेत नमूद करावेत.

## परिशिष्ट " अ "

**मोठे संशोधन प्रकल्प (Major Research Project)** (प्रकल्प मंजूरीच्या पत्राची प्रत जोडावी.)

| प्रकल्पाचे नाव | प्रकल्पातील कार्यरत पद | अनुदान संस्थेचे नाव | अनुदान रक्कम | शेरा |
|---|---|---|---|---|
| | | | | |

**लघु संशोधन प्रकल्प (Minor Research Project)** (प्रकल्प मंजूरीच्या पत्राची प्रत जोडावी.)

| प्रकल्पाचे नाव | प्रकल्पातील कार्यरत पद | अनुदान संस्थेचे नाव | अनुदान रक्कम | शेरा |
|---|---|---|---|---|
| | | | | |

## परिशिष्ट " ब "

**विविध स्तरावरील चर्चासत्र /परिसंवाद/ कार्यशाळेमध्ये सादर केलेले संशोधन लेख (Research Papers)**

| प्रकार चर्चासत्र/परिसंवाद/ कार्यशाळा | स्तर | ठिकाण | दिनांक | संशोधन लेखाचे नाव (Title of Research Paper) |
|---|---|---|---|---|
| | | | | |

## परिशिष्ट " क "

**राज्य / राष्ट्रीय /आंतरराष्ट्रीय स्तरावरील चर्चासत्रांना उपस्थिती**

| चर्चासत्राचा दिनांक | स्तर | ठिकाण | शेरा |
|---|---|---|---|
| | | | |

**विभागीय / राज्य / राष्ट्रीय / स्तरावरील कार्यशाळांना उपस्थिती**

| कार्यशाळेचा दिनांक | स्तर | ठिकाण | शेरा |
|---|---|---|---|
| | | | |

## परिशिष्ट " ड "

**अध्यापन करीत असलेल्या विषयातील संदर्भ ग्रंथ/क्रमिक पुस्तके प्रकाशित केली त्याचा तपशील**

| ग्रंथाचे /क्रमिक पुस्तकाचे नाव | लेखक/ सहलेखक / संपादक | प्रकाशन कालावधी | प्रकाशक | त्यापैकी किती अभ्यासक्रमात समावेश करण्यात आले |
|---|---|---|---|---|
| | | | | |

**अध्यापन करीत नसलेल्या विषयातील संदर्भ ग्रंथ/क्रमिक पुस्तके प्रकाशित केली त्याचा तपशील**

| ग्रंथाचे /क्रमिक पुस्तकाचे नाव | लेखक/ सहलेखक / संपादक | प्रकाशन कालावधी | प्रकाशक | त्यापैकी किती अभ्यासक्रमात समावेश करण्यात आले |
|---|---|---|---|---|
| | | | | |